# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २६/०६/२०२२ (रविवार)

---

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बोरी :–** अंतर्गत बोरखेडी रेल्वे ६ किमी दक्षीण. येथे दिनांक २४.०६.२२ चे २१.०० वा. ते २१.१५ वा. यातील फिर्यादी हे मृतक रविन्द्र खुरसंगे याचे मोटर सायकल क्रं. एम एच ४०, ए.डी. ५८८० ने डबलसीट जात असता बोरखेडी टोल नाक्याचे अगोदर रोडवर ट्रक क्रं.एम एच ४० ए के ५६३६ हा रस्त्यावर उभा होता व रोडवर अंधार असल्याने उभा असलेल्या ट्रक मध्ये कोणत्याही प्रकारचे इंडिकेटर सुरु नसल्यामुळे फिर्यादी व मृतक यांना ट्रक दिसुन न आल्याने मोटर सायकल ची धडक ट्रकचे मागील बाजुस लागल्याने फिर्यादी व मृतक दोघेही खाली पडले. त्यात मृतक यास डोक्याला मार लागून रक्त निघाले व तो जागीच मरण पावला. व फिर्यादी यास किरकोळ मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कपिल आशिष ज्योतीराम ढोके वय २७ रा. बोरखेडी रेल्वे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे ट्रक क्रं.एमएच ४० एके ५६३६ चा चालका विरूध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ), २८३ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो उपनि पालीवाल मो. क्रं. ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत पिपळा डाग बंगला ८ कि मी पश्चिम, येथे दिनांक २५.०६.२२ चे १५.०० ते १५.३० वा दर, यातील जख्मी फिर्यादी हा पुतणी व जावई हे झगडा भांडण करीत असल्याने त्यांना समजावण्याकरीता त्यांच्या घरी गेले व आरोपी जावई नामे– रोहीत रागडाले रा. लौणखैरी यास तुम्ही कशाला भांडण करता ? तुम्ही माझ्या पुतणीला त्रास का देता ? असे आरोपीस म्हटले असता आरोपीने जखमी फिर्यादीला लाकडी काठीने पाठीवर व डाव्या कानावर मारून जख्मी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मदन मुरलीधरजी भकने वय ५५ वर्ष रा पिपळा डागबंगला यांचे रिपोर्टवरून पो स्टे खापरखेडा येथे कलम ३२४ भादवि अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोहवा गुरूप्रकाश मेश्राम पो स्टे खापरखेडा मो नं. ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

## ट्रक चोरी

**पोलीस स्टेशन खापा :–** अंतर्गत उमरी शिवार, येथे यातील फिर्यादी नामे लक्ष्मीकांत मोतीलाल गोंगाटे यांचा उमरी जामळापानी येथे विटा भंट्टयाचा व्यवसाय असून त्यांचेजवळ टाटा ट्रक २५१५(टिप्पर) क्र एमएच–४० ७२८५ असा आहे. पावसामूळे विटा भंटट्याचे काम बंद असल्याने, फिर्यादी यांचा ट्रक हा उमरी जामळापानी येथे दि १९/०६/२०२२ चे २० दिवसाअगोदर पासून येथे उभा होता दिनांक २२/०६/२०२२ चे ०८/०० वा ला फिर्यादी हे आपले विटा भंट्टयाचा व्यवसाय उमरी जामळापानी येथे गेले असता, त्यांना त्यांचा ट्रक क्र ट्रक २५१५(टिप्पर) क्र एमएच–४० ७२८५ किं. ६,००,०००/– रू. हा तिथे दिसला नाही. तो कोनीतरी अज्ञात चोरानी चोरूण नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लक्ष्मीकांत मोतीलाल गोंगाटे वय ३५ वर्ष रा दर्गा रोड किल्लेपुरा खापा यांचे रिपोर्टवरून पो स्टे खापा येथे आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस हवालदार गंगाधर ठाकरे मो – ९९२३९०८३८२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक :–** अंतर्गत दिनांक २५.०६.२२ रोजी अंबाळा तलाव रामटेक येथे यातील मृतक नामे मयुर अशोक कांबळे वय २१ वर्ष रा. तांडा पेठ नागपुर हा आपल्या आजीच्या अस्थी विसर्जनाचा कार्यक्रमा करीता अंबाळा तलाव रामटेक येथे आला असता, अस्थी विसर्जनाचा कार्यक्रम संपवुन आंघोळ करण्याकरीता मृतक हा अंबाळा तलावाच्या पाय–यावर आंघोळ करीत असता, अचानक पायरीवरून पाय घसरून पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर मधुकर तरारे वय ३८ वर्ष रा. भंडारबोडी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के पोस्टे रामटेक मो.न. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**